स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

अंतर्गत

स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्याशाखेतील संगीत विषयात पीएच.डी. पदवीसाठी विद्यापीठास सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा अंतीम आराखडा

: विषय :

“हिंदी सिनेसंगीतामध्ये शास्त्रीय संगीताचे योगदान – एक चिकीत्सक अभ्यास”(१९४० ते १९६०)

संशोधक

प्रा. पल्लवी प्रभूराज कुलकर्णी
संगीत विभाग
के.सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालय, परभणी

संशोधन मार्गदर्शक

डॉ.प्रा.राजेंद्र एच. देखमुख
माजी संगीत विभाग प्रमुख, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ

संशोधन केंद्र

भाषा, वाङ्मय आणि संस्कृती अभ्यास संकुल
स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
नांदेड

मार्च २०२१

“हिंदी सिनेसंगीतामध्ये शास्त्रीय संगीताचे योगदान – एक चिकीत्सक अभ्यास”
(१९४० ते १९६०)

प्रस्तावना

संगीताचा आणि मानवी मनाचा अत्यंत जवळचा संबंध आहे. संगीत कलेच्या माध्यमातुन माणसाचे जसे मनोरंजन होते, तसेच ज्ञानार्जन देखील होते. सामान्यपणे संगीत कलेचे शास्त्रीय संगीत, लोकसंगीत, वाद्य संगीत, सुगम संगीत असे प्रकार आहेत. यामध्ये सुगम संगीत हा सर्वाधिक लोकप्रिय असा संगीत प्रकार आहे. सुगम संगीताचे उत्तम सादरीकरण करण्यासाठी शास्त्रीय संगीताचा पाया असणे आवश्यक आहे. शास्त्रीय संगीतात राग ही संकल्पना मतंगमुनींच्या काळापासून वापरली जाते. रागाचा मुख्य गुण मनोरंजन आहे. याच मनोरंजनाचे चित्रपट हे सर्वात मोठे आणि लोकप्रिय माध्यम आहे. चित्रपट हे ज्ञान आणि मनोरंजनाच्या दृष्टीने मागील १०० वर्षांहून अधिक काळापासुन सक्रीय राहिले आहेत. नुकताच सन २०१३ रोजी भारतीय चित्रपट सृष्टीने आपला शताब्दी महोत्सव साजरा केला. सुरुवातीचे चित्रपट हे मुकपट होते परंतु बोलपटांचा प्रारंभ झाल्यापासुन संगीताशिवाय चित्रपटांची कल्पनाच करता येत नसे. त्यामुळे चित्रपट संगीत या एका नव्या संकल्पनेचा उगम झाला. सुरुवातीपासुनच चित्रपट संगीतात विविध रागांचा वापर सातत्याने करण्यात आला आहे, असे दिसून येते. हा वापर दोन प्रकारे करण्यात आला. एक म्हणजे शास्त्रीय संगीतातील बंदिशींचे सरलीकरण करुन सोप्या चाली संगीतकारांनी बांधल्या. दुसरे म्हणजे खास रागदारी रचना बांधुन चित्रपटात त्यांचा वापर करण्यात आला.

या प्रकारचे संगीत १९४०-१९६० या कालखंडात सर्वाधिक वापरण्यात आले. स्वरमेळ (Harmoney) आणि स्वरसंवाद (Melody) ही दोन सांगितीक तत्वे चित्रपट संगीतात वापरण्यात येतात. त्या दृष्टीने बघता १९४०५१९६० या काळातील संगीत स्वरसंवाद तत्वाकडे अधिक झुकल्याचे दिसून येते. या काळात संगीतकारांकडे जी मोजकी वादये उपलब्ध होती, त्यांच्या आधारे त्यांनी चित्रपटांना संगीत दिले. दर्जेदार साहित्य (काव्य) आणि रागदारी संगीताचा प्रयोग यामुळे ही गाणी आजही आपल्याला लक्षात राहतात. याउलट वर्तमान

काळातील यांत्रिकीकरणाच्या रेट्यामुळे चित्रपट संगीत हे अधिकाधिक स्वरमेळ प्रधान बनले आणि दुर्देवाने त्यातील संगीताचा आत्मा हरवतो की काय अशी शंका वाटते.

म्हणून मला १९४०-१९६० या काळातील चित्रपट संगीतातील रागदारी संगीताचे योगदान अभ्यासण्याची आवश्यकता आहे असे वाटले. कारण तत्कालिन संगीतकारांना रागदारी संगीताचे ज्ञान होते, पण त्यांनी ते मैफिलीत न वापरता चित्रपटांना संगीत देण्यासाठी वापरले. तसेच गायक-गायिकांनी आपला आवाज शास्त्रीय संगीताच्या मैफिलीत न देता चित्रपट गीतांना पार्श्वगायक / गायिकेच्या रुपात दिला. पण म्हणून त्यांचे रागदारी ज्ञान, साहित्याची समज या गोष्टी आपल्याला कमी लेखुन चालणार नाही. या सर्वांना कुठेतरी न्याय मिळावा आणि वेगाने बदलणाऱ्या आजच्या २१व्या शतकात संगीतातील या पूर्वसुरींनी चित्रपटात करुन ठेवलेले हे महान कार्य दुर्लक्षित राहणार नाही याच हेतुने मी १९४० ते १९६० या काळातील हिंदी चित्रपटातील रागदारी संगीताचा चिकित्सक अभ्यास करण्याचा निर्णय घेतला.

हिंदी सिनेसंगीतात शास्त्रीय संगीताचे योगदान बघताना मुळात चित्रपट हे कला सादरीकरण आणि संरक्षणाचे सशक्त माध्यम आहे, हा विचार आवश्यक आहे. नाट्यकला संगीत नाटक्ांच्या स्वरुपात जोपासली जात असतांनाच तिच्या उत्तरावस्थेत चित्रपट कलेचा उगम झाला. संगीत नाटके प्रत्यक्ष नाट्यगृहात जाऊन समोरासमोर बघितली जात होती. पण चित्रपटांच्या आगमनाने ही गरज उरली नाही. आपण सादर केलेला अभिनय नंतर संरक्षित रुपात जतन केला जाऊ लागला आणि श्रोत्यांना त्यांच्या सोईनुसार कधीही पाहण्याची सोय उपलब्ध झाली. मराठी माणूस आणि संगीत नाटक हे समीकरण जसे रुढ होते तोच प्रकार कालांतराने चित्रपटांच्या बाबतीतही पहायला मिळाला हे विशेष. संगीत नाटकांना जेष्ठ नाटककार विष्णुदास भाव्यांनी जसे आढळस्थान देवून रंगभूमीची निर्मिती केली, तेच कार्य चित्रपटांच्या बाबतीत दादासाहेब फाळके यांनी चित्रपटसृष्टीचा पाया रचून केले. त्यामुळे मराठी रंगभूमी दिन आणि चित्रपटसृष्टीच्या प्रारंभाची शताब्दी या दोन्ही घटना भारतीय समाजासाठी अभिमानाच्या आहेत.

नाटक असो की चित्रपट, दोघांच्याही लोकप्रियतेत मानाचा तुरा रोवला गेला तो संगीत कलेमुळेच. गंमतीची गोष्ट म्हणजे सुरुवातीला संगीत नाटक होती, ती नंतरच्या काळात केवळ अभिनय करणारी बोल नाटके बनली. कारण त्यात पदे नव्हती. गायक आणि नट अशा कुशल कलाकाराची नंतर नंतर उणीव भासू लागली. या उलट चित्रपट सृष्टीचा विचार करता सुरुवातीला मुकपट युग होते. कालांतराने चित्रपट बोलू लागला आणि त्यात संगीताचा समावेश झाला. हा समावेश आजतागायत कायम आहे. संगीताने चित्रपटात इतके अढळ स्थान मिळवले की भारतीय चित्रपट (रुढ नाव बॉलिवुड)आणि चित्रपट संगीत याचे अतूट असे नाते निर्माण झाले. पाश्चात्य चित्रपटांत पार्श्वसंगीताला अधिक महत्व आहे. भारतीय चित्रपटात मात्र पार्श्वगायन करण्याच्या दृष्टीने नायक / नायिकेच्या तोंडी गाणी दिली जातात. याच गाण्याला चित्रपट गीत असे म्हणतात. चित्रपटातील दोन प्रसंगांना जोडणारे हे गीत असते. चित्रपटाची कथा पुढे घेऊन जाण्याचे ते कार्य करते. चित्रपट गीत आणि कथा या एकसंघ कशा होतील या दृष्टीने दिग्दर्शक, पटकथा लेखक, गीतकार, संगीतकार, संपादक ही सारीच मंडळी प्रयत्नशील असतात.

वैश्विक संगीतात जशी विविधता दिसून येते, तशीच भारतीय संगीतात देखील विविधता दिसून येते. कारण भारत हा विविधतेत एकता जोपासणारा देश आहे. त्यामुळे गुजरातपासून आसामपर्यंत आणि हिमालयापासून कन्याकुमारी पर्यंतचे संगीत वेगवेगळे आहे. ते संगीत त्या त्या भागातील लोकांच्या जीवनपध्दती मांडते. त्या त्या भागातील संस्कृतीचे प्रतिनिधीत्व करते. हिंदी चित्रपट संगीत मात्र या सर्वांचाच एकत्रित समावेश असणारे असल्यामुळे चित्रपट संगीतात भारतातील सर्वच प्रांताचे प्रतिनिधीत्व दिसून येते. अशा या चित्रपट संगीतावर मराठी, गुजराती, राजस्थानी, मारवाडी, कानडी, तेलगु, मल्याळी, बंगाली, आसामी, हिंदी भाषिक राज्यातील संगीताचा प्रभाव समानतेने जाणवतो. विशेषतः शास्त्रीय रागाधारीत चित्रपट गीते ऐकताना त्या त्या प्रांतांची झलक आपल्याला दिसते. कारण भारतीय रागदारी संगीत देखील प्रादेशिक संगीतातून विकसित झालेले शास्त्राचा आधार मिळालेलेच संगीत आहे. मग यात उत्तर भारतीय सारंग राग, गुजरात प्रदेशातील गुर्जरी राग, कलिंग प्रदेशातील कालिंगडा, दक्षिण भारतातील सरस्वती राग, मेघ मल्हार, मियाँ मल्हार सारखे वर्षा ऋतुचे राग दिसून येतात.

चित्रपटगीतांमधील शास्त्रीय संगीताचा वापर कसा झाला हे समजुन घेण्यासाठी चित्रपट गीतांचे विविध प्रकार त्यातील प्रसंगांनुसार पाडता येतील. धार्मिक चित्रपटात भजन, अभंगासारखे गीतप्रकार दिसतात. प्रेमपटात, गझल सारखे गीतप्रकार दिसतात. देश भक्तीची शिकवण देणाऱ्या चित्रपटांत देशभक्तीपर गीते दिसतात. पाश्चात्य धाटणीच्या चित्रपटांत पाश्चात्य संगीताचा वापर केला जातो. सारांश रुपाने असे सांगता येईल की चित्रपटाच्या कथानकाच्या गरजेनुसार चित्रपटाचे संगीत बदलते. चित्रपटांचा इतिहास बघितल्यावर असे समजते की, ज्याप्रमाणे सुरुवातीच्या काळातील संगीत नाटके धार्मिक विषयांवर आधारीत होती (उदा. संगीत रुक्मिणी स्वयंवर, संगीत जयजय गौरीशंकर, संगीत मृच्छकटिक, संगीत सीता स्वंयवर इत्यादी) त्याच प्रमाणे सुरूवातीच्या काळातील चित्रपट देखील धार्मिक कथानक असलेले होते. नंतरच्या काळात सामाजिक समस्या मांडणारे चित्रपट निर्माण झाले. यात प्रेमकथा त्या मूळ कथानकातच गुंफलेली असे. अशा दोन्ही प्रकारच्या म्हणजे धार्मिक आणि सामाजिक समस्या प्रधान चित्रपटात विशेषतः १९४०, १९५०, १९६० च्या दशकात शास्त्रीय संगीताची महत्वाची भूमिका राहिली आहे. बोलपटांची सुरुवात करणारा अयोध्येचा राजा त्याचे ज्वलंत उदाहरण सांगता येईल. अशा सर्वच चित्रपटांत १९४० ते १९६० या दरम्यान शास्त्रीय संगीताचे मोठ्या प्रमाणावर वापर झाला. संगीतकार आणि गायक हे मूळचे शास्त्रीय संगीताचे अभ्यासक होते. पं. डी.व्ही.पलुस्कर, पं.शंकरराव व्यास, प्रो. बी.आर. देवधर ग्वाल्हेर घराण्याशी संबंधीत संगीतकार होते. गोविंदराव टेंबे स्वतःला जयपूर घराण्याच्या अल्लादियाँ खाँ चे शिष्य मानत. अर्धशास्त्रीय चित्रपट संगीत परंपरेचा पाया रचणारे मास्टर कृष्णराव देखील ग्वाल्हेर, आग्रा आणि जयपूर घराण्याची तालिम मिळवणाऱ्या देवगंधर्व पं. भास्करबुवा बखल्याचे शिष्य होते.

या संपूर्ण काळाचा विचार करता केवळ संगीतकारच नव्हे तर गायक देखील शास्त्रीय संगीताचे प्रशिक्षण घेतलेल्यापैकी होते. लता मंगेशकर हे याचे सुपरिचित उत्तम उदाहरण आहे. त्या भेंडीबाजार घराण्याच्या उस्ताद अमान अली खाँच्या शागिर्द होत्या. संगीतकार व गायकांबरोबरच या काळातील गीतकार देखील संगीताची उत्तम जाण असणारे होते. त्यांना साहित्य व शास्त्रीय संगीताची उत्तम जाण होती. त्यामुळे १९४०, १९५० व १९६० च्या

दशकात गायक, गीतकार व संगीतकारांच्या त्रिवेणी संगमातुन शास्त्रीय संगीतावर आधारीत उत्तमोत्तम चित्रपट गीतांची निर्मिती झाली.

हिंदी सिनेसंगीतात शास्त्रीय संगीताचे योगदान अभ्यासताना हिंदी चित्रपट संगीतकाराबरोबरच मूळचे शास्त्रीय संगीताच्या प्रांतात असणाऱ्या कलाकारांचे चित्रपट संगीतातील योगदान देखील अभ्यासावे लागेल. प्रसिध्द बासरी वादक पं. पन्नालाल घोष यांनी "बॉम्बे टॉकीज" च्या चित्रपटांना संगीत दिले. यात "अज्ञात" आणि "बसंत" सारखे चित्रपट गाजले. हिंदी चित्रपटातील पहिल्या महिला संगीतकार होण्याचा बहुमान मिळवणाऱ्या खुर्शीद मिनोचर होमजी ऊर्फ सरस्वती देवी या लखनऊच्या मॉरीस कॉलेजच्या प्राध्यापिका होत्या. बॉम्बे टॉकिजच्या अस्पृश्य गर्ल, जीवननैया हे त्यांनी संगीत दिलेले चित्रपट होत. "गुंज उठी शहनाई" या चित्रपटामुळे शहनाई नवाज बिस्मिल्ला खाँ हे नांव घरोघर पोचले. प्रसिध्द सतारवादक पं. रवीशंकर यांनी इंडियन पिपल्स थिएटर असोसिएशनच्या "धरती का लाल" चित्रपटाला संगीत दिले. त्यांनीच संगीत दिलेले कल्पना, पाथेर पांचाली, अपूर संसार, चेस के खिलाडी हे चित्रपट खूप लोकप्रिय ठरले.

प्रसिध्द तबला वादक उस्ताद अल्लारखाँ यांनी जवळजवळ २० चित्रपटांना संगीत दिले. यात "सबका" आणि "बेवफा" हे चित्रपट खूप गाजले. १९५२ रोजी "आंधियान" चित्रपटाला सरोदवादक अली अकबर खाँ यांनी संगीत दिले. बासरीवादक पं. हरीप्रसाद चौरसिया आणि संतुर वादक पं. शिवकुमार शर्मा यांनी शिवहरी या नावाने सिलसिला, डर, लम्हे, चांदनी या चित्रपटांना संगीत दिले. या शास्त्रीय संगीतातील वादकांप्रमाणे शास्त्रीय गायकांनी देखील आपले योगदान चित्रपट संगीतात दिले आहे. "बैजु बावरा"चित्रपटात नौशाद यांनी शास्त्रीय गायक उस्ताद अमीरखाँ (इंदौर घराणे) आणि पं. डी.व्ही. पलुस्कर (ग्वाल्हेर घराणे) यांच्या आवाजाचा वापर करुन घेतला. उस्ताद अमीर खाँ झनक झनक पायल बाजे चित्रपटात वसंत देसाई यांच्या मार्गदर्शनात गायले. मुगल ए आजम या ऐतिहासिक चित्रपटात बडे गुलाम अली यांनी एक गीत गायले. बसंत बहार चित्रपटात भारतरत्न पं. भीमसेन जोशी यांनी मन्ना डे यांच्यासोबत शीर्षक गीत गायले. जयपूर अत्रौली घराण्याच्या शास्त्रीय गायिका

गानसरस्वती किशोरीताई अमोणकर यांनी "गीत गाया पत्थरोंने" या हिंदी चित्रपटाचे शिर्षक गीत गायले. अशा प्रकारे हिंदी चित्रपट संगीत समृध्द करण्यात शास्त्रीय गायक वादकांनी आपापले योगदान दिले आहे.

साठ ते सत्तर वर्षांपूर्वी पासून ते आजपर्यंत चित्रपट संगीताने लोकांचे मनोरंजन तर केलेच पण पूर्वी विशेषतः १९४० ते १९६० च्या कालखंडात ज्या संगीतकारांनी रागदारी संगीत चित्रपटांत वापरले व ती गाणी आजरामर केली ती आपणास विसरुन चालणार नाही. कारण आपण आजही ती गीते ऐकत आहोत आणि त्याचा आनंद घेत आहोत. मला प्रकर्षाने त्यामुळेच हे वाटले की या संगीतकारांनी चित्रपटात वापरलेले रागदारी संगीत व्यवस्थितपणे मांडून अभ्यासावे आणि त्यांचे हे कार्य अभिजात संगीताच्या विकासात कसे पूरक आहे, ते सामान्य संगीत प्रेमी व चित्रपट प्रेमींना पटवून द्यावे. विशेषतः १९४० ते १९६० या काळातील गाणी शास्त्रीय संगीतावर आधारीत असल्यामुळे हाच कालखंड सदरील संशोधनासाठी गृहित धरण्यात आला आहे.

चित्रपट संगीत या विषयावर आजपर्यंत जे संशोधन झाले, त्याचा संक्षिप्त आढावा घेण्याचा मी प्रयत्न केला आहे.

यात १९४० ते १९६० या कार्यकाळातील संगीतकारांनी चित्रपटांमध्ये केलेला रागदारी संगीताचा प्रयोग यावर कोठेही संशोधन आढळून आले नाही. म्हणूनच या विषयाची निवड मी केली आहे.

या विषयाचा अभ्यास करत असताना सुरुवातीला मी चित्रपट संगीताच्या इतिहासाचा संक्षिप्त आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासोबतच हिंदी चित्रपटांत शास्त्रीय संगीताच्या महत्वाचा आढावा घेतला आहे. शास्त्रीय संगीत म्हणजेच रागदारी संगीत हे औघाने येतेच.त्यामुळे विविध रागांचा हिंदी चित्रपटांमध्ये झालेला उपयोग मी माझ्या संशोधनात मांडला आहे.

या रागांचा हिंदी चित्रपटांत कौशल्यपूर्ण उपयोग करुन हिंदी चित्रपट संगीताचे सौंदर्य खुलवण्यात ज्या मुख्य संगीतकारांनी अपापले योगदान दिले आहे, त्या संगीताकरांच्या चित्रपट संगीतातील योगदानाचा आढावा मी घेतला आहे. संगीतकारांनी चित्रपट गीतांना लावलेला रागदारी संगीतातील चाली तितक्याच तयारीने गाणारे पार्श्वगायक व पार्श्वगायिका यांची देखील दखल सदरील संशोधनात घेण्यात आली आहे. सदरील संशोधनाच्या माध्यमातुन हिंदी चित्रपटांतून भारतीय शास्त्रीय संगीताची आवड समाजात निर्माण होईल, याची मला आशा वाटते.

अशा या हिंदी चित्रपट संगीतात वापरण्यात आलेल्या शास्त्रीय संगीताचा केवळ तत्कालिनच नव्हे तर आजच्या समाजजीवनावर देखील खोलवर परिणाम झालेला दिसतो. त्या काळात प्रसिध्द असलेला “बिनाका गीतमाला” हा आकाशवाणी कार्यक्रम जितक्या आवडीने त्या काळात ऐकला जायचा, तितक्याच आवडीने “विविध भारती” सारखे आकाशवाणी चॅनल आजही ऐकले जाते. संगीत सरीता या कार्यक्रमाद्वारे शास्त्रीय कलाकारांचा राग संगीतावर आधारीत कार्यक्रम आजही रसिक ऐकतात. एफ.एम. रेडिओच्या कितीतरी वाहिन्या आजही जुन्या हिंदी चित्रपटगीतांच्या प्रसारणाकरीताच वाहिल्या आहेत. लोक आजही ही जुनी हिंदी गीते तितक्याच आवडीने ऐकतात आणि त्या काळात गेल्याचा प्रत्यय अनुभवतात.चित्रपट कालखंड निहाय बदलत गेला पण त्यातील संगीत ही बाजु प्रत्येक काळात तितकीच जिव्हाळ्याची राहीली.

चित्रपट संगीताच्या या रंजक प्रवासावर आजही अनेक मान्यवर संगीततज्ञ आणि संगीत समिक्षक आपली अभ्यासपूर्ण मते मांडतात. त्यांचे विविध वर्तमानपत्रातील लेख आजही तितक्याच आवडीने वाचले जातात. त्यांचे संकलन करुन पुस्तके प्रकाशित केली जातात. अशाच काही मान्यवर संगीततज्ञ आणि संगीत समीक्षकांच्या मुलाखती सदरील संशोधनाच्या परिशिष्टाअंतर्गत आपल्याला वाचावयास मिळतील.

विषयाची निवड

भारतीय रागदारी संगीताचा प्रचार प्रसार करण्यात प्रत्येक काळात त्या त्या माध्यमाने आपली बहुमोल भूमिका वठवली आहे. चित्रपटांचे आगमन होण्यापूर्वी हे कार्य संगीत नाटकांनी केले. तेइतके दमदार होते, की कित्येक नाट्यपदांना तत्कालिन मान्यवर गायकांच्या संगीताने केले. चित्रपट संगीताची ही अर्धशास्त्रीय परंपरा मास्टर कृष्णराव फुलंब्रीकरांनी सुरू केली आणि नंतरच्या काळात हीच परंपरा कितीतरी महान संगीतकारांनी जोपासली. त्या संगीतकारांनी संगीतबध्द केलेली गीते अभ्यासली असता, त्यात आपल्याला कितीतरी रागांचे चलन दिसते. ही गीते रागाधारीत गीते म्हणून ओळखली जातात. विशेषतः १९४० ते १९६० या काळातील विविध संगीतकार तर संगीतातील विविध घराण्यांशी संबंधित होते. म्हणून त्यांना राग आणि तालांचे अचुक ज्ञान होते. केवळ त्यांनी हे आपले ज्ञान रागदारी संगीताच्या मैफिलीत न वापरता चित्रपटांना संगीत देण्याकरीता वापरले. पण म्हणून त्यांची महानता कमी होत नाही. जी गोष्ट संगीतकारांची तीच गोष्ट गायक / गायिकांना देखील लागू होते. आपला मधुर आवाज शास्त्रीय संगीताच्या मैफिलीत न वापरता त्यांनी चित्रपटात पार्श्वगायनाकरीता वापरला. पण म्हणून त्यांचे रागदारीचे ज्ञान, साहित्याची समज या गोष्टी आपल्याला कमी लेखून चालणार नाहीत. या सर्वांना आजही कुठेतरी न्याय मिळावा आणि वेगाने बदलणाऱ्या आजच्या २१व्या शतकात संगीतातील या पूर्वासुरींनी चित्रपटांत करुन ठेवलेले हे महान कार्य दुर्लक्षित राहणार नाही, याच हेतुने मी १९४० ते १९६० या काळातील हिंदी चित्रपटांतील रागदारी संगीताचा चिकित्सक अभ्यास करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी काही निवडक चित्रपट गीते निवडून त्यांचे स्वरलेखन लिहून काढले. हे स्वरलेखन आणि संबंधित राग यांची योग्य सांगड घालुन आपला संशोधन प्रबंध पूर्णत्वास नेला.

संशोधनाची उपयोगिता

प्रस्तुत संशोधनामध्ये भारतीय अभिजात आणि रागदारी संगीताचा प्रचार आणि प्रसार लक्षात घेता असे निदर्शनास येते की, चित्रपटाच्या सुरूवातीपासून आजपर्यंत दिवसेंदिवस प्रगतीच होत आहे. पण पुर्वीच्या जुन्या हिंदी चित्रपट संगीतामध्ये रागदारी किंवा शास्त्रीय

संगीताचा वापर कशा पध्दतीने आणि भावाशयाला पुरक असा सुयोग्य रितीने मांडणी करुन रागांची निवड करत संगीत तयार होत होतं ते अजरामर झालेलं आहे आणि जुन्या हिंदी चित्रपटांमध्ये जास्तीतजास्त संगीत देताना शास्त्रीय संगीताला प्राधान्य होतेच. शास्त्रीय संगीतामध्ये शास्त्र संमत काही नियमांचे बंधन आवश्यक असतं आणि या नियमांचं पालनही चित्रपटांमध्ये केलं जात होतं. कारण चित्रपट हा भारतीय प्रेक्षकांसाठीचा होता.

हिंदी चित्रपट संगीताच्या क्षेत्रामध्ये उच्च कोटीचे संगीतकार होते, जे शास्त्रीय संगीतामध्ये उच्च शिक्षित असे होते. त्यांनी हिंदी चित्रपटांमध्ये रागदारी संगीताचा उपयोग करुन हिंदी चित्रपट संगीताला नवी दिशा मिळवून दिली आहे.

म्हणूनच मला असे वाटते की १९४० ते १९६० हा कार्यकाळ मी या संशोधनासाठी निवडला आहे आणि या काळातल्या संगीतकारांनी रागदारी संगीताच्या प्रसाराचं जे कार्य केलं आहे, त्याचा आढावा घेतलाच पाहिजे कारण भारतीय अभिजात संगीत हे या महान संगीतकार आणि गायक कलाकारांमुळेच आपली पारंपारीकता आजतागायत टिकवून आहे.

संशोधनाची व्याप्ती

प्रस्तुत संशोधनामध्ये १९४० ते १९६० या कालावधीतील हिंदी चित्रपट संगीतातील गीतांवर अभ्यास करण्यात आला आहे. या काळातील संगीतकार, या काळातील चित्रपट व त्यातील शास्त्रीय संगीतावर आधारीत गीतांची यादि येथे देण्यात आली आहे. गीतांसाठी शुध्द रागांचा, मिश्र रागांचा वापर तसेच एकाच वेळी दोन रागांचा वापर तसेच कोमल, तीव्र स्वरांचा वापर, जोड रागांचा वापर यावर देखील अभ्यास करण्यात आला आहे. तसेच या काळातील संगीतकारांमध्ये नौशाद अली, वसंत देसाई, जयदेव, एस.डी. बर्मन, अनिल बिस्वास, खय्याम इत्यादि संगीतकारांनी केलेल्या सांगितीक कार्याचा आढावा घेण्यात आला आहे. तसेच त्यांनी तयार केलेली रागदारी संगीतावर आधारीत गीते ही भावाशयाला पुरक किती प्रमाणात आहेत याचा देखील विचार आणि अभ्यास या संशोधनात करण्यात आला आहे. हे सर्व करत असताना गायक / गायिका आणि संगीताकरांसोबतच संबंधित गीते लिहिणाऱ्या गीतकारांचा देखील ओझरता उल्लेख या संशोधनात आला आहे.

संशोधनाची उद्दीष्टये

हिंदी चित्रपट संगीतावर आजपर्यंत कोणकोणते संशोधन झाले, याचा पूर्वाभ्यास सदरील संशोधन सुरू करण्यापूर्वी करण्यात आला. १९४० ते १९६० या कार्यकाळातील संगीतकारांनी चित्रपटांमध्ये केलेला रागदारी संगीताचा उपयोग यावर झालेले संशोधन संशोधनकर्तीस आढळून आलेले नाही. म्हणूनच या विषयाची निवड येथे करण्यात आली आहे. त्यासाठी संशोधनकर्तीस चित्रपट संगीताच्या इतिहासापासून ते १९६० या कालावधीचा संक्षिप्त आढावा घेणे क्रमप्राप्त ठरले आहे.

१. चित्रपट संगीताच्या इतिहासाचा आढावा घेणे
२. चित्रपट संगीताचे महत्व याचा आढावा घेणे
३. विविध रागांचा चित्रपटांमध्ये झालेल्या उपयोगाचा आढावा घेणे
४. रागांच्या सौंदर्याचा प्रयोग कशाप्रकारे करण्यात आला याचा आढावा घेणे
५. संगीतकारांच्या आणि गायक / गायिकांच्या कार्याचा आणि सांगितीक योगदानाचा आढावा घेणे
६. अभिजात शास्त्रीय संगीत चित्रपटांच्या माध्यमातून लोकांपर्यंत कसे पोहोचले याचा आढावा घेणे
७. शास्त्रीय संगीताची आवड ही या संशोधनामुळे सर्वसामान्य लोकांमध्ये कशी वाढेल याचा आढावा घेणे

संशोधनाच्या पध्दती

प्रस्तत सशोधनासाठी ऐतिहासिक संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे प्रामुख्याने १९४० ते १९६० या कालावधीतील चित्रपट, संगीतकार, गायक आणि गीतांचा अभ्यास करण्यात आला आहे. अनेक ग्रंथालयांना भेटी देवून तेथील चित्रपट संगीतावरील ग्रंथ, पुस्तके, मासिक, साप्ताहिक यांचा आधार घेऊन संशोधन कार्य करण्यात आले आहे. सदरील संशोधनात ज्या गीतांचे स्वरलेखन देण्यात आले आहे, त्यासाठी युटयुबवर ज्या गीतांची उपलब्धता आहे, त्याचा समावेश करण्यात आला आहे. संशोधनाच्या

शेवटीपरिशिष्टात त्या गीतांचा युटयुब लिंक सह उल्लेख करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील पुणे विद्यापीठ, एन.सी.पी.ए. मुंबई, जिल्हा अ वर्ग नामांकित गणेश वाचनालय, परभणी या ठिकाणांना भेटी दिल्या. याशिवाय उत्तर प्रदेशातील लखनऊ येथील पं. भातखंडे संगीत विद्यापीठ येथे भेट देवून साहित्य मिळवले.

आकाशवाणीचा संगीत सरीता हा कार्यक्रम, दूरदर्शन, इंटरनेट या माध्यमांचा वापर तसेच चित्रपटांवरील रागांवर आधारीत असलेल्या गाण्यांच्या ध्वनीमुद्रिका श्रवण केल्या. तसेच गाण्यांची अंगतपंगत, गीत गाता हूँ मैं, विविधभारती, महाराष्ट्रसंगीत परिवार या व्हॅटसअॅप ग्रुप चा माझे संशोधन कार्य पूर्ण करण्यास मी उपयोग केला आहे. या सर्व माध्यमांचा उपयोग मी माझ्या संशोधन कार्यासाठी केला आहे. त्याचप्रमाणे अनेक महाविद्यालयातील प्रस्तुत विषयाशी अनुसरुन होणाऱ्या चर्चासत्र, कार्यशाळा यात सहभागी होऊन माझे संशोध्न कार्य पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रकरणांची रूपरेषा

प्रकरण १ : चित्रपट संगीताचा इतिहास

मुकपट ते बोलपट असा चित्रपट संगीताचा आढावा यात घेण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधन हे १९४० ते १९६० या कालावधीशी संबंधित असल्यामुळे या काळाचा विशेष अभ्यास केला गेला असून त्या काळातील संगीतकार चित्रपटांना कशा पध्दतीने संगीत देत याचा विचार प्रामुख्याने करण्यात आला आहे. चित्रपट आगमन होण्यापूर्वी संगीत नाटकांची एक समृध्द परंपरा विशेषतः महाराष्ट्र, कर्नाटक आणि बंगाल प्रांतांत अस्तित्वात होती. नाटकांतील प्रसंग अधिक उठावदार करण्यासाठी संगीताचा वापर करावा, असे प्रतिपादन भरताचे नाट्यशास्त्र हा ग्रंथ करतो. भरतमुनींनी साधारण पाच हजार वर्षापूर्वी हा ग्रंथ लिहिला असून तो भारतीय शास्त्रीय संगीतातील आदय ग्रंथ समजला जातो. संगीत कलेचे मूळ वेदांमध्ये सांगितले जाते. त्यातहि सामवेद आणि सामवेदाचा उपवेद म्हणून गंधर्ववेद यांचा उल्लेख येथे आवर्जुन करावा लागेल. अशा वैदिक साहित्यातून विकसित होत आलेली संगीत कला पूढे नाटकांत आली आणि नंतर चित्रपटांत तिचा प्रवेश झाला. चित्रपट हे कलात्मक व तंत्रज्ञान यांचा संगम

असलेले सर्जनशील असे बहुजन माध्यम असून लोकरंजन व लोकशिक्षणाचे एक प्रभावी साधन आहे. असे मराठी विश्वकोष सांगतो. भारतात चित्रपटांचे आगमन १९व्या शतकाच्या शेवटच्या दशकात म्हणजेच सन १८९६ रोजी झाले. पण हे सुरूवातीचे चित्रपट संवाद नसलेले मूकपट होते. त्यामुळे त्यात संगीताची कोणतीच भूमिका दिसून येत नाही. भारतीय चित्रपटसृष्टीचे जनक "दादासाहेब फाळके" यांनी सन १९१२ रोजी राजा हरीश्चंद्र चित्रपटाची निर्मिती केली. २१ एप्रिल १९१३ रोजी ऑलम्पियाड थिएटर मध्ये त्याचा पहिला शो झाला. पण भारतीय मुकपट होण्याचा मान त्या चित्रपटाला मिळाला. नंतरच्या काळात १४ मार्च १९३१ रोजी आलमआरा हा भारतीय बोलपट प्रदर्शित झाला आणि हिंदी चित्रपटांत संगीताचा प्रवेश होण्याचा मार्ग प्रशस्त झाला. कारण आलमआरा चित्रपटापासूनच संगीताचे पदार्पण झाल्याचे दिसून येते. यातील गाणी शास्त्रीय रागाधारीत होती.नंतरच्या काळात १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाल्यावर चित्रपट संगीत अधिकच खुलत गेले. यात विविध संगीतकारांनी रागांना प्राधान्य देत आपापल्या चाली बांधल्या.

चित्रपटांतुन अर्थार्जन होवू शकते याची जाणीव याच काळात प्रामुख्याने झाली. संगीत नाटकांत ज्याप्रमाणे गायक नट ही संकल्पना होती, ती नंतरच्या काळात चित्रपटांतून कमी झाल्यामुळे पार्श्वगायन परंपरेचा विकास झाला. तसेच सुरूवातीच्या संगीत नाटकांना ज्याप्रमाणे स्वतः नाटककारच चाली देत, त्याऐवजी नंतर संगीतकार ही स्वतंत्र जागा निर्माण झाली. सुरूवातीला नाटककारच स्वतः पदे लिहित. पण नंतरच्या नाटकांत पदे इतरांकडून लिहून घेण्यात येवू लागली. ही स्थित्यंतरे नंतरच्या काळात भारतीय चित्रपटसृष्टीत बघावयास मिळतात. याचाच परिणाम म्हणून पार्श्वगायक / पार्श्वगायिका, संगीतकार, गीतकार, वादक, ध्वनीमुद्रक असे कितीतरी चित्रपटांशी संबंधित व्यवसाय निर्माण झाले. त्यांनी विविध कलाकारांना प्रसिध्दी आणि पैसा अशा दोन्ही गोष्टी मिळवून दिल्या. रागदारी संगीताच्या दृष्टिने १९४० ते १९६० हा सुवर्णकाळ समजला जातो, त्यामुळे या काळातील घटनांबद्दल आजही चित्रपट प्रेमी, समीक्षक, संगीततज्ञ भरभरुन बोलतात. याच काळाचा समावेश सदरील संशोधनात करण्यात आला आहे.

प्रकरण २ : हिंदी चित्रपटात शास्त्रीय संगीताचे महत्व

या प्रकरणामध्ये या काळातील संगीतकारांनी रागदारी संगीताचा उपयोग चित्रपट संगीतामध्ये करुन त्याचे महत्व कसे दाखवून दिले, याचा आढावा घेण्यात आला आहे. त्यासाठी चित्रपट संगीतकारांच्या पाच घराण्यांचा उल्लेख येथे करण्यात आला आहे. रविंद्र संगीत, पंजाबी संगीत, सुगम संगीत, पाश्चात्य संगीत आणि शास्त्रीय संगीत अशी पाच प्रकारची संगीतकारांची घराणीच जणू या काळात अस्तित्वात होती. यातील शास्त्रीय संगीताचा वापर करुन चित्रपटांना संगीत देण्याचे कार्य मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांच्या पासुन सुरू झाले. म्हणूनच त्यांना अर्धशास्त्रीय संगीताचे जनक म्हणतात.

चित्रपटांच्या निर्मितीपासूनच चित्रपट हे माध्यम मानव जीवनाचे एक अविभाज्य अंग बनले आहे. मनोरंजन आणि समाजप्रबोधन ही चित्रपट निर्मितीमागील प्रमुख उद्दष्टये सांगितली जातात. भारतीय जनमानसावर पाच दशकांहून अधिक काळ गारुड घालणारा चित्रपट हा समाजाचा आरसा आहे. कारण चित्रपटातील कथानकाचा जसा समाजावर प्रभाव पडतो त्याचप्रमाणे समाजात घडणाऱ्या घटनांमुळे प्रेरित होऊन चित्रपटांची निर्मिती केली जाते. यातुनच सामाजिक समस्या मांडणारे चित्रपट, सांस्कृतिक घटनांचा आढावा घेणारे चित्रपट आणि दैनंदिन जीवनातील घडामोडींवर प्रकाश टाकणारे चित्रपट अशा तीन प्रकारच्या चित्रपटांची निर्मिती होते. हिंदी चित्रपटांचा आशय आणि विषय विचारात घेता, चित्रपटांची निर्मिती होण्यामागे चित्रपटाची कथा आणि उद्देश पण महत्वाचे ठरतात. यावरुन असे स्पष्ट होते की चित्रपट संगीत सर्वसामान्य रसिकांसाठी किती मौल्यवान ठेवा आहे. मूकपटाच्या वेळी देखील संगीताची गरज होतीच. त्यासाठी पडद्यावरच्या दृश्यांच्या सोबतीने संगीत नाटकांप्रमाणे समारासमोर बसून वादकांद्वारे संगीत वाजवले जात. त्यानंतर चित्रपट बोलका झाला आणि तो गायला लागला. त्या गाण्यांवर नाट्यसंगीत आणि शास्त्रीय संगीताचा प्रभाव होता. त्या नंतरच्या काळात संगीतकारांनी चित्रपट संगीतात बरेचसे नावीन्य आणले.

आजही हिंदी सिने संगीताने समाजात स्वतःचं असं एक स्वतंत्र स्थान निर्माण केलं आहे. सन १९१३ ते सन २०१३ ही भारतीय चित्रपटसृष्टीची शतकमहोत्सवी वाटचाल बघता

चित्रपटांच्या लोकप्रियतेत संगीत नक्कीच प्रत्येक वेळी महत्वाच्या भूमिकेत राहिले आहे. ज्याप्रमाणे "आत्म्याशिवाय शरीर" त्याचप्रमाणे "संगीताशिवाय चित्रपट" असे समीकरण म्हटले तर वावगे ठरणार नाही. अशा या हिंदी चित्रपट गीतांमध्ये कथानकाच्या मागणीनुसार आणि संगीतकारांच्या कल्पकतेनुसार कितीतरी रागांचा वापर करण्यात आला. यात उत्तर भारतीय संगीतातील १० थाट आणि त्यातुन निर्माण होणारे हजारो राग यांचा समावेश आपल्याला करावा लागेल. हिंदी चित्रपटांतील शास्त्रीय संगीताच्या वापरात केवळ रागांचा विचार करून रेडीमेड चालणार नाही, तर त्याचप्रमाणे टप्पा, ठुमरी, भजन, गझल, दादरा, होरी, झुला, सावन असे विभिन्न गीतप्रकार चित्रपटांच्या कथेच्या गरजेनुसार आजपर्यंत चित्रपटांत वापरण्यात आले. केवळ गायनच नव्हे तर वादनाच्या क्षेत्रात देखील विविध शास्त्रीय वादयांबरोबरच कितीतरी लोकवादये चित्रपटांत वापरण्यात आली. कितीतरी चित्रपट गीतांतील वापरण्यात आलेली सतार, बासरी, वीणा, सरोद, संतुर, व्हायोलिन ही शास्त्रीय वादये आणि त्यांचे विशिष्ट स्वर आजही सामान्य रसिकांच्या मनावर रूंजी घालतात. गायन, वादना बरोबरीनेच चित्रपट तज्ञांनी शास्त्रीय संगीतातील नृत्याला देखील वेळोवेळी आपलेसे केले. कधी शुध्द स्वरूपात तर कधी फ्युजन स्वरूपात शास्त्रीय नृत्य चित्रपटांचा एक भाग बनले. कत्थक, कथकली, भरतनाटयम, मोहिनीअट्टम, ओडीसी असे कितीतरी शास्त्रीय नृत्यप्रकार त्या त्या चित्रपटांत त्यांच्या कथानकाच्या गरजेनुसार वापरले गेले. अर्थात यात केवळ एकाच प्रांताचे योगदान नव्हते तर काश्मिर ते कन्याकुमारीपर्यंत आणि गुजरात पासुन ते आसामपर्यंत पसरलेल्या खंडप्राय भारत देशाचे ते एकत्रित प्रयत्न होते.

हिंदी चित्रपटांतील शास्त्रीय संगीता अंतर्गत या राग, ताल, नृत्य आणि वादयांच्या विविधतेचा विचार करता काही हिंदी चित्रपट हे चित्रपटसृष्टित मैलाचा दगड ठरले. त्यांचा सदरील संशोधनात अवर्जुन उल्लेख करण्यात आला आहे. यात बैजु बावरा (१९५२), झनक झनक पायल बाजे (१९५५), वसंत बहार (१९५६), सुवर्ण सुंदरी (१९५८), गुंज उठी शहनाई (१९५८), अनारकली (१९५३), अदालत (१९५८), तानसेन (१८४३), मुगल ए आझम (१९६०), संगीत सम्राट तानसेन (१९६२) या चित्रपटांचा समावेश होतो.

प्रकरण ३ : विविध रागांचा उपयोग आणि त्यातील भावाशय

संगीतकारांनी चित्रपटांमध्ये रागदारी संगीताचा उपयोग करतांना भावाशयाप्रमाणे कोणकोणत्या रागांचा वापर करुन घेतला याचा संक्षिप्त आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे. राग आणि रस, राग आणि ऋतु, स्वर आणि रस, ताल आणि रस यांचा संबंध अभ्यासताना यमन, खमाज, भूपाली, बागेश्री, काफी, देस अशा प्रचलित रागांबरोबरच झिझोटी, शिवरंजनी, चारूकेशी, किरवाणी आशा अप्रचलित रागांचा देखील संगीतकारांनी अत्यंत कुशलतेने चित्रपट गीतांकरीता वापर केल्याचे सोदाहरण येथे सांगण्यात आले आहे.

पं. विष्णु नारायण भतखंडे यांनी उत्तर हिंदूस्थानी संगीताचे प्रमाणिकरण करताना १० थाटांची निर्मिती केली. प्रचलित, अप्रचलित अशा सर्व रागांना या १० थाटांतवर्गीकृत केले. याच वर्गीकरणाचा आधार घेत आजपर्यंत चित्रपटांत कोणकोणते राग वापरण्यात आले, त्या रागांवर आधारीत गीतांचे संकलन या प्रकरणात आपल्याला सापडते. याशिवाय सदरील संशोधनात ज्या निवडक गीतांच्या स्वरलेखनाचा समावेश करण्यात आला आहे, ती गीते देखील त्यांच्या रागांच्या संपूर्ण माहिती सह येथे देण्यात आली आहे. सदरील स्वरलेखन हा माझा एक स्वतंत्र अभ्यास असून यासाठी कोणत्याही तयार केलेल्या स्वरलेखन पुस्तकाचा आधार घेण्यात आला नाही, हे येथे आवर्जुन नोंदवावे लागेल. हे स्वरलेखन भातखंडे लिपित देण्यात आली आहेत. रागांचा भावाशय समजुन घेण्यासाठी स्वर, शब्द, ताल, लय, कथानक अशा कितीतरी गोष्टी आपल्याला विचारात घ्याव्या लागतील, असे प्रतिपादन येथे करण्यात आले आहे. कारण एकाच रागात कधी श्रृंगारीक तर कधी दुःखी गीत आपल्याला ऐकावयास मिळते. त्याचे कारण प्रत्येक वेळी त्या रागातील स्वरसंगती, ताल, लय, शब्द, प्रसंग बदलतात. त्यात पुन्हा ऐकणाऱ्याच्या मानसिकतेचा देखील आपल्याला विचार करावा लागेल. त्यावरून सदरील प्रकरणात विविध रागांचा उपयोग आणि त्यातील भावाशय अभ्यासण्यात आला आहे.

शास्त्रीय संगीतावर आधारीत गीतांची यादी येथे देण्यात आली आहे.

प्रकरण ४ : संगीतकारांचे आणि गायकांचे कार्य आणि योगदान

या प्रकरणामध्ये संगीतकारांनी चित्रपट गीतांमध्ये रागदारी संगीताचा वापर करुन अभिजात संगीताच्या प्रसार आणि प्रचारात आपले योगदान कशा प्रकारे दिले आहे याचा आढावा घेण्यात आला आहे. १९४० ते १९६० या काळात ज्यांची गाणी लोकप्रिय ठरली असे सर्वच संगीतकार आणि ज्यांची गाणी तितक्याच ताकतीने पेश करून रसिकांची वाहवा मिळवली असे सर्वच प्रमुख गायक / गायिकांच्या चरित्र आणि कार्याचा आढावा या प्रकरणात घेण्यात आला आहे.

चित्रपट संगीतातील रविंद्र संगीत, पंजाबी संगीत, अर्धशास्त्रीय संगीत, माधुर्य संगीत आणि पाश्चात्य संगीत अशा विविध घराण्यांचा आढावा घेतल्यावर आपल्याला असे समजते , की सुरूवातीच्या काळातील म्हणजेच सन १९४० ते १९६० या काळातील चित्रपट संगीत लोकप्रिय करण्यात अर्धशास्त्रीय संगीतातील संगीतकारांचे मोलाचे योगदान राहिले आहे. याची सुरूवात महाराष्ट्रातील सुप्रसिध्द गायक, संगीततज्ञ, नट मास्टर कृष्णराव फुलंब्रीकर यांनी केली. यात नंतरच्या काळात वसंत देसाई, खेमचंद प्रकाश, नौशाद, जयदेव, खय्याम इत्यादि संगीताकरांनी आापापले योगदान दिले आहे. यातील प्रत्येक संगीतकाराची संगीत देण्याची शैली वेगवेगळी होती, पण कोणीही रागदारी संगीताचा हात सोडला नाही. मैफिलीतील राग अगदी ३ ते ४ मिनीटांच्या चित्रपट गीतांच्या माध्यमातून त्यांनी अचुकपणे मांडले. त्यांच्या याच कौशल्यामुळे आजही लोक त्यांची गीते आवर्जुन ऐकतात. संगीतकारांची शैली आणि त्यांनी संगीत दिलेली रागदारी गीते यांचा उल्लेख चरित्रात करण्यात आला आहे. यात खेमचंद प्रकाश, अनिल बिस्वास, वसंत देसाई, हुस्नलाल - भगतराम, नौशाद, आर.सी. बोराल, सी.रामचंद्र, रोशन, कल्याणजी आनंदजी, शंकर जयकीशन, मदन मोहन, सलिल चौधरी, रवी, अशा प्रथितयश संगीतकारांबरोबरच फिरोज निजामी, पहिल्या महिला संगीतकार सरस्वती देवी, गोविंदराम, रफिक गझवनी, पं. श्रीनाथ त्रिपाठी, बुलो सी रानी, गुलाम हैदर, गुलाम महंमद, दत्ता कोरगावकर, ज्ञान दत्ता, चित्रगुप्त, सज्जाद हुसैन, जयदेव असे कितीतरी प्रसिध्द परान्मुख पण अविट गोडीची गीते स्वरबध्द करणाऱ्या संगीतकारांची नावे देखील आपल्याला विसरून

चालणार नाहीत. संशोधनाच्या कालमर्यादेमुळे यातील काही संगीतकार कदाचित माझ्याकडून दुर्लक्षिले गेले असतील, पण हा प्रमाद घडण्याचे कारण मुळात काहि संगीतकारांनी मोजक्याच चित्रपटांना संगीत दिले आणि ते चित्रपटसृष्टीतुन बाहेर पडले, हे असू शकेल. त्याहिपेक्षा या संगीतकारांची लिखीत स्वरूपात माहिती उपलब्ध न होण्यास तत्कालिन प्रसार माध्यमांची अकार्यक्षमता कारणीभूत असू शकते. त्यामुळे आज २१व्या शतकात अशा पूर्णतः विस्मृतीत गेलेल्या संगीतकारांची माहिती कशी शोधायची, हा देखील माझ्यापुढे यक्षप्रश्नच होता.

जी गोष्ट संगीतकारांची तिच गोष्ट गायकांना देखील लागु होते. चित्रपटसृष्टीच्या प्रारंभापासूनच त्यावर आपला ठसा उमटवणारे कुंदनलाल सैगल, नुरजहाँ, अमीरबाई कर्नाटकी, महंमद रफी, लता मंगेशकर, हेमंत कुमार, आशा भोसले, तलत महमूद, मुकेश, मन्ना डे हे गायक गायिका जसे आजही सर्वांच्या लक्षात राहतात, तसेच त्या त्या चित्रपटांत कथानकाच्या गरजेनुसार गायन करणारे पण मुळ शास्त्रीय गायक असणारे पं. डी.व्ही. पलुस्कर, पं. भीमसेन जोशी, उस्ताद बडे गुलाम अली, उस्ताद आमीर खान, सरस्वती देवी, हिराबाई बडोदेकर, किशोरी आमोणकर या गायका गायिकांचे देखील हिंदी चित्रपट सृष्टितील योगदान आपल्याला दुर्लक्षुन चालणार नाही. म्हणून सदरील संशोधनात प्रस्थापित हिंदी पार्श्वगायक गायिकांबरोबरच या गायक गायिकांचादेखील अवर्जुन उल्लेख करण्यात आला आहे.

प्रकरण ५ : १९४० ते १९६० या काळातील हिंदी चित्रपट संगीतातील गीतांचा समाज जीवनावर परिणाम

आज हिंदी सिनेसंगीताने समाजात स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. चित्रपट संगीताचे स्वतंत्र असे अस्तित्व आहे. विभिन्न प्रदेशाचे संगीत हिंदी चित्रपटांमध्ये एकत्र आल्यामुळे सिनेसंगीताचे एक वेगळे अस्तित्व आणि ओळख निर्माण होते. भारतीय समाजाचे दर्शन घडवणारी आणि मानवी जीवनातील वास्तवाचे दर्शन हिंदी चित्रपटांच्या गीतांतुन आपल्याला घडते. समाजात घडणाऱ्या घटना या गीतांच्या माध्यमातुन आपण बघत असतो.

हिंदी चित्रपट संगीतातील शास्त्रीय संगीताचा समाज जीवनावर परिणाम अभ्यासताना सुरूवातीला या प्रकरणात चित्रपटांचे कालखंड निहाय विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात

आला आहे. चित्रपटांच्या कथानकानुसार त्यात शास्त्रीय संगीताचा प्रवेश झाला. ज्या चित्रपटांची कथा पाश्चात्य ढंगाची होती, त्यात भारतीय शास्त्रीय संगीत आपल्याला पहायला मिळणार नाही. हिंदी चित्रपटांत वापरले गेलेले राग थाट निहाय वर्गीकृत करुन त्यांच्या स्वरपक्षाकडे अधिक लक्ष वेधण्याचा माझा प्रयत्न आहे. त्यामुळे त्या रागांचा गीतांवर काय परिणाम झाला ? आणि त्या गीतांचा श्रोत्यांवर काय परिणाम झाला हे समजणे सोपे होईल. हिंदी चित्रपट संगीतातील शास्त्रीय संगीताच्या वापरामुळे रागदारी संगीताचा प्रचार प्रसार कसा झाला ? विविध रागांची माहिती सामान्य जनतेला कशी झाली ? विविध वादये सर्वसामान्य लोकांना कसे माहित झाले ? वादक कसे लोकप्रिय झाले ? विविध शास्त्रीय नृत्यांची माहिती कशी झाली ?चित्रपट संगीताशी संबंधित विविध व्यवसायांचा उगम कसा झाला ? शास्त्रीय गायक गायिकांना प्रसिध्दी मिळवून देण्यात चित्रपट संगीताने कसे योगदान दिले ? समाजात करावके ट्रक वर गाणारे हौशी स्त्री पुरूष गायक गायिका कसे तयार झाले ? चित्रपटांनी स्त्री पुरूष समानता साधण्यात कशी भूमिका निभावली ? या सर्व बाबींचा आढावा येथे घेण्यात आला आहे.

प्रकरण ६ : निवडक संगीततज्ञ आणि संगीत समिक्षकांच्या मुलाखती

मी सदरील संशोधनासाठी खालील निवडक संगीततज्ञ आणि समिक्षकांच्या मुलाखती घेतल्या आहेत.

१. सूरमणी डॉ. पं. कमलाकरराव परळीकर
२. श्री अजय देशपांडे
३. श्री अशोक उजळंबकर
४. सौ. सई देशपांडे
५. श्री विश्वनाथ ओक
६. श्री विश्वास नेरूरकर

प्रकरण ७ : सारांश

सिनेमा संगीतस्य कारणम असे म्हणणाऱ्या पं. गोविंदरावजी टेंबेंच्या या वाक्यामुळे हिंदी सिनेमांत संगीताची भूमिका किती महत्वाची आहे, ते समजते. त्यातही भारतीय सिनेमा हा संगीताशिवाय परीपूर्ण असूच शकत नाही. विशेषतः १९४० ते १९६० या काळातील चित्रपटांतील गीते लक्षात घेता काही चित्रपट प्रेमी केवळ त्या चित्रपटांतील गाणी ऐकण्यासाठी म्हणून त्या काळात वारंवार चित्रपटगृहात जात असे किस्से सांगितले जातात. कारण या काळात भारतात टेलिव्हीजन सेटचे आगमन झाले नव्हते. आकाशवाणी ही एकमेव गीते ऐकण्याचे माध्यम होते. त्यातही रेडिओ सेट हे मोजक्याच धनिक लोकांकडे होते. मग सर्वसामान्य लोकांच्या मनोरंजनाची भूक भागवण्याकरीता आकाशवाणीवरून कधी कधी प्रसारित होणारे हिंदी चित्रपट गीतांचे कार्यक्रम खूप महत्वाचे ठरत. शिवाय प्रत्येक हिंदी चित्रपट ज्या चित्रपटगृहात प्रदर्शित केले जात त्या चित्रपटगृहाबाहेर प्रचंड गदी होत.

माणूस हा मनोरंजनाचा भूकेला असतो. त्यादृष्टिने सुरूवातीला त्याची मनोरंजनाची भूक भागवण्याचे कार्य संगीत नाटकांनी केले. नंतर संगीत नाटकांची जागा चित्रपटांनी घेतली. सुरूवातीच्या काळात झालेले मुकपटांचे आगमन त्या दृष्टिने बदलाची सुरूवात होती. नंतर बोलपटांचे आगमन झाल्यावर त्यात संगीताचा प्रवेश झाला. त्यातून चित्रपट संगीताशी संबंधित विविध व्यवसाय निर्माण झाले. सन १९४० ते १९६० हा संगीताच्या दृष्टिने चित्रपटांचा सुवर्णकाळ होय.

अशा या चित्रपटांना सजवण्यात आणि लोकप्रिय करण्यात संगीताने नेहमीच महत्वाची भूमिका बजावली आहे. दैनंदिन जीवन सुखकर करण्याकरीता चित्रपटांत आलेली गीते माणसाचे दुःख हलके करणारी ठरली. चित्रपटांच्या कथानकाच्या आवश्यकतेनुसार विविध रागांचा प्रयोग त्यात करण्यात आला. यात विविध संगीतकार आणि पार्श्वगायक / पार्श्वगायिकांचे मोठे योगदान राहिले आहे. या सर्वांचा परिणाम स्वातंत्र्यपूर्व काळातील समाजाबरोबरच स्वातंत्र्योत्तर समाजावर देखील मोठ्या प्रमाणावर झाला आहे.

सदरील संशोधन निवडक रागदारी गीतांच्या उदाहरणासह हाच परिणाम सर्वांसमोर मांडते आणि आज २१व्या शतकातील चित्रपट संगीत देखील तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे ळे तुरळक प्रमाणात का होईना रागांवर आधारीत आहे, हे दाखवण्याचा प्रयत्न करते. परंतु या सर्वांचे मूळ सन १९४० ते १९६० या कालखंडातील चित्रपट संगीतात आहे, हे आपल्याला विसरून चालणार नाही.

परिशिष्ट

युटयुब संकेतस्थळावरील गीतांची लिंक सी.डी.सह

हिंदी चित्रपट संगीतकार आणि गायकांची छायाचित्र

निवडक संगीततज्ज्ञ आणि संगीत समीक्षकांच्या मुलाखतींची प्रश्नावली

निष्कर्ष

१. चित्रपट संगीताचा समृध्द इतिहास समजला
२. चित्रपटांमध्ये शास्त्रीय संगीताचे महत्व समजले
३. विविध रागांचा चित्रपटांत प्रभावी वापर कसा झाला असेच त्या रागांचा परिचय सर्वसामान्य जनतेला होण्यास मदत होते.
४. रागांच्या सौंदर्याचा प्रयोग चित्रपट गीतांमध्ये उत्तमरीत्या करून त्यांची परिणामकारकता साधली जाते.
५. चित्रपट संगीत समृध्द करण्यात विविध संगीतकार आणि गायक यांचे मोठे योगदान राहिले आहे. या संशोधनामुळे त्यांच्या कार्याचा व जीवनाचा परिचय होवून त्यातून प्रेरणादाई अभ्यासाची वृत्ती निर्माण झाली.
६. सर्वसामान्य जनतेला चित्रपट संगीताच्या माध्यमातून रागांची आणि तालांची प्राथमिक ओळख झाली.
७. अभिजात शास्त्रीय संगीत चित्रपटांच्या माध्यमातून सामान्य लोकांपर्यंत पोहोचले.

८. शास्त्रीय संगीताची आवड ही या संशोधनामुळे सर्वसामान्य लोकांत निर्माण होण्यास मदत झाली.

संशोधनातील समस्या

१. संगीतकार आणि गायक यांच्या कार्याचा शोध घेण्यासाठी त्यांच्या दुर्मिळ ध्वनीफिती प्राप्त करणे

२. संशोधन विषयाशी संबंधित संगीततज्ज्ञ आणि समिक्षकांच्या मुलाखती घेणे

३. संगीतकार आणि गायकांच्या कालखंड निर्धारणात मतभेद आढळून आले.

४. काही गीतांच्या राग निर्धारणा बाबत मतभेद दिसून येतात.

प्रस्तुत विषयाच्या प्रबंध लेखनाचा स्थुल आराखडा मी आतापर्यंतच्या अभ्यासाला अनुसरून सादर केलेला आहे. तरीही निवडलेल्या संशोधन विषयाचा अभ्यास करत असताना काहि वेगळे संदर्भ हाती लागले, तर या संशोधनात आवश्यक तेथे बदल होवू शकतो.

सदरील संशोधनात ज्या गीतांचे स्वरलेखन समाविष्ट करण्यात आले आहे, त्या गीतांची यादी.

अ.क्र.	**गीताचे बोल**	**चित्रपटाचे नांव**	**संगीतकार**	**गायक / गायिका**	**राग**
१.	तेरे सूर और मेरे गीत	गुंज उठी शहनाई	वसंत देसाई	लता मंगेशकर	बिहाग
२.	तुम तो प्यार हो	सेहरा	रामलाल	लता मंगेशकर, महंमद रफी	बिहाग
३.	हमारे दिल से ना जाना	उडन खटोला	नौशाद अली	लता मंगेशकर	बिहाग
४.	सखी री सुन बोले पपिहा	मिस मेरी	हेमंत कुमार	लता मंगेशकर, आशा भोसले	बिहाग
५.	ऐ दिल ए	शहाजहान	नौशाद अली	कुंदनलाल सैगल	बिहाग

	बेकरार				
६.	बाग लगा दू सजनी	तानसेन	खेमचंद प्रकाश	कुंदनलाल सैगल	बहार
७	कलियन संग करता	शापमोचन	हेमंत मुखोपाध्याय	पं. दत्तात्रय पलुस्कर	बहार
८	पवन दिवानी	डॉ. विदया	एस.डी. बर्मन	लता मंगेशकर	बहार
९	चाह बरबाद करेगी हमे	शाहजहान	नौशाद अली	कुंदनलाल सैगल	बागेश्री
१०	जाग दर्द ए इश्क जाग	अनारकली	सी. रामचंद्र	हेमंत कुमार, लता मंगेशकर	बागेश्री
११	ना बोले ना बोले	आझाद	सी. रामचंद्र	लता मंगेशकर	बागेश्री
१२	जब दिल को सतावे गम	सरगम	सी. रामचंद्र	लता मंगेशकर, सरस्वतीबाई राणे	आसावरी
१३	जो मै जानती बिसरत है	शबाब	नौशाद अली	लता मंगेशकर	आसावरी
१४	कह दो कोई ना करे यहाँ प्यार	गुंज उठी शहनाई	वसंत देसाई	महंमद रफी	आसावरी
१५	केतकी गुलाब जुही	वसंत बहार	शंकर जयकीशन	भीमसेन जोशी, मन्ना डे	बसंत बहार
१६	बसंत है आया	स्त्री	सी. रामचंद्र	आशा भोसले, महेंद्र कपूर	बसंत बहार
१७	सुर ना सजे	बसंत बहार	शंकर जयकीशन	मन्ना डे	बसंत बहार

१८	कैसे आउ जमुना के	देवता	सी. रामचंद्र	लता मंगेशकर	भैरवी
१९	सुध बिसर गई आज	संगीत सम्राट तानसेन	एस.एन. त्रिपाठी	महंमद रफी, मन्ना डे	भैरवी
२०	सांवरे सांवरे	अनुराधा	रवी शंकर	लता मंगेशकर	भैरवी
२१	जो तूम तोडो पिया	झनक झनक पायल बाजे	वसंत देसाई	लता मंगेशकर	भैरवी
२२	मेरे ऐ दिल बता	झनक झनक पायल बाजे	वसंत देसाई	लता मंगेशकर, मन्ना डे	भैरवी
२३	मधुकर शाम हमारे चोर	भक्त सूरदास	ग्यान दत्त	कुंदनलाल सैगल	भैरवी
२४	बाबुल मोरा नैहर छूटो	स्ट्रिट सिंगर	आर.सी. बोराल	कुंदनलाल सैगल	भैरवी
२५	अब तेरे सिवा कौन	किस्मत	अनिल बिस्वास	अमीरबाई कर्नाटकी	भैरवी
२६	आई दिवाली आई	रतन	नौशाद अली	जोहराबाई जंबालेवाली	भैरवी
२७	हमे तो शाम ए गम में	जुगनु	फिरोज निजामी	नुरजहाँ	भैरवी
२८	क्या मिल गया भगवान	अनमोल घडी	नौशाद अली	नूरजहाँ	भैरवी
२९	जब दिल ही टूट गया	शहाजहान	नौशाद अली	कुंदनलाल सैगल	भैरवी

या गीतांच्या स्वरलेखनाचा आधार घेऊन त्यामधील शास्त्रीय संगीतातील गान तत्व, त्याच्या विविध हरकती व इतर सौंदर्यात्मक भाग हा क्रियात्मक स्वरूपाने निष्कर्ष काढून तो शोध प्रबंधात देण्यात आला आहे.

सदरील संशोधनात ज्या गीतांचे स्वरलेखन समाविष्ट करण्यात आले आहे, ती गीते संशोधनकर्तीने परीश्रम पुर्वक मिळविली आहेत.

अ. क्र.	**गीताचे बोल**	**युटयुब लिंक**
१	तेरे सूर और मेरे गीत	https://www.youtube.com/watch?v=ljG6atDKyxo
२	तुम तो प्यार हो	https://www.youtube.com/watch?v=gygx5W79b2g
३	हमारे दिल से ना जाना	https://www.youtube.com/watch?v=i_PpCdclEJ0
४	सखी री सुन बोले पपिहा	https://www.youtube.com/watch?v=hgublnQTcUk
५	ऐ दिल ए बेकरार	https://www.youtube.com/watch?v=GViS4gBh5F8
६.	बाग लगा दू सजनी	https://www.youtube.com/watch?v=uN7EUuMHl7U
७	कलियन संग करता	https://www.youtube.com/watch?v=w3P0cIFkjxo
८	पवन दिवानी	https://www.youtube.com/watch?v=PBs9hvOJx04
९	चाह बरबाद करेगी हमे	https://www.youtube.com/watch?v=P5IUQBh52Ds
१०	आग दर्द ए इश्क जाग	https://www.youtube.com/watch?v=VzXrJ3DzMsE
११	ना बोले ना बोले	https://www.youtube.com/watch?v=bMd_Ab7U8VU
१२	जब दिल को सतावे गम	https://www.youtube.com/watch?v=LPjnd4lE0Vo
१३	जो मै जानती बिसरत है	https://www.youtube.com/watch?v=f8NCfVyxD7w
१४	कह दो कोई ना करे यहाँ प्यार	https://www.youtube.com/watch?v=LmxmfQnsSuU
१५	केतकी गुलाब जुही	https://www.youtube.com/watch?v=FseICrhx-W0

१६	बसंत है आया	https://www.youtube.com/watch?v=Tp_BPGKGwRc
१७	सुर ना सजे	https://www.youtube.com/watch?v=0jGUBOCmB_I
१८	कैसे आउ जमुना के	https://www.youtube.com/watch?v=Js7LosaknB8
१९	सुध बिसर गई आज	https://www.youtube.com/watch?v=UmHIM9WsYYU
२०	सांवरे सांवरे	https://www.youtube.com/watch?v=NGCu_A-bQuo
२१	जो तूम तोडो पिया	https://www.youtube.com/watch?v=UQIO-SNvEe4
२२	मेरे ऐ दिल बता	https://www.youtube.com/watch?v=KSem2uvOQ0c
२३	मधुकर शाम हमारे चोर	https://www.youtube.com/watch?v=CtHJkTFMakc
२४	बाबुल मोरा नैहर छूटो	https://www.youtube.com/watch?v=H1PD5J3dKlQ
२५	अब तेरे सिवा कौन	https://www.youtube.com/watch?v=k3iNwgznNrg
२६	आई दिवाली आई	https://www.youtube.com/watch?v=rSRPU_yXOx4
२७	हमे तो शाम ए गम में	https://www.youtube.com/watch?v=VcTDHlS1oHI
२८	क्या मिल गया भगवान	https://www.youtube.com/watch?v=Zh_kH4Xm9yA
२९	जब दिल ही टूट गया	https://www.youtube.com/watch?v=7lZLePeN7BA

सदरील गीते उच्च स्वरूपात एका सी.डी मध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत. सदरील संशोधनात ज्या संगीतकारांच्या संगितीक योगदानाचा विचार करण्यात आला आहे, त्यांची कालखंड निहाय यादी

अ.क्र.	संगीतकाराचे नांव	कालखंड (सन ते सन पर्यंत)
१	फिरोज निजामी	१९१० ते १९७५
२	गोविंदराम	१९४० चे दशक
३	रफिक गझनवी	१९०७ ते १९७४
४	सरस्वती देवी – पहिल्या महिला संगीतकार	१९१२ ते १९८०

५	पं. श्रीनाथ त्रिपाठी	१९१३ ते १९८८
६.	वसंत देसाई	१९१२ ते १९७५
७	बुलो सी रानी	१९२० ते १९९३
८	हुस्नलाल - भगतराम	हुस्नलाल १९९८ ते १९६८ भगतराम १९१८ ते १९७३
९	गुलाम हैदर	१९०८ ते १९५३
१०	गुलाम महंमद	१९०३ ते १९६८
११	दत्ता कोरगावकर	१९४० ते १९५६
१२	नौशाद अली	१९१९ ते २००६
१३	ज्ञान दत्ता	१९३७ ते १९६५
१४	रामलाल	१९२२ ते २००४
१५	हेमंत कुमार	१९२० ते १९८९
१६	रायचंद बोराल	१९०३ ते १९८१
१७	पंकज मलिक	१९०५ ते १९७८
१८	अनिल बिस्वास	१९१४ ते २००३
१९	सी. रामचंद्र	१९१८ ते १९८२
२०	एस.डी बर्मन	१९०६ ते १९७५
२१	रोशन	१९१७ ते १९६७
२२	कल्याणजी - आनंदजी	कल्याणजी १९२८ ते २०००, आनंदजी १९३३ ते आजपर्यंत
२३	शंकर जयकीशन	शंकर १९२२ ते १९८७, जयकीशन १९२९ ते १९७१
२४	मदन मोहन	१९२४ ते १९७५
२५	सलील चौधरी	१९२२ ते १९९५
२६	चित्रगुप्त	१९१७ ते १९९१

२७	सज्जाद हुसैन	१९१७ ते १९९५
२८	जयदेव	१९१९ ते १९८७
२९	रवी	१९२६ ते २०१२
३०	खेमचंद प्रकाश	१९०७ ते १९५०
३१	ओ.पी. नय्यर	

यातील काही संगीतकारांचा जन्मापासून ते मृत्युपर्यंतचा संपूर्ण कालखंड दिसून येतो, तर काही संगीतकारांचा प्रत्यक्ष चित्रपट सृष्टीत संगीत देताना कार्यरत असलेला कालखंड दिसून येतो. तत्कालीन कागदपत्रांच्या पूर्णत्वाच्या अभावी काही संगीताकरांच्या कालखंडाबाबत मतभेद दिसून येतात.

सदरील संशोधनात ज्या गायक / गायिकांच्या संगितीक योगदानाचा विचार करण्यात आला आहे, त्यांची कालखंडनिहाय यादी

अ.क्र.	गायक / गायिकेचे नांव	कालखंड (सन ते सन पर्यंत)
१	कुंदनलाल सैगल	१९०४ ते १९४६
२	महंमद रफी	१९२४ ते १९८०
३	तलत महमुद	१९२४ ते १९९८
४	आशा भोसले	१९३३ ते आजपर्यंत
५	मन्ना डे	१९२० ते २०१३
६.	अमीरबाई मर्नाटकी	१९०६ ते १९६५
७	जोहराबाई अंबालेवाली	१९१८ ते १९९०
८	नूरजहाँ	१९२६ ते २०००
९	महेंद्र कपूर	१९३४ ते २००३
१०	सुमन कल्याणपूर	१९३७ ते आजपर्यंत
११	लता मंगेशकर	१९२९ ते आजपर्यंत

संगीतकारांप्रमाणेच यातील काही गायक / गायिकांचा जन्मापासून ते मृत्युपर्यंतचा संपूर्ण कालखंड दिसून येतो, तर काही गायक / गायिका प्रत्यक्ष चित्रपटांत पार्श्वगायन क्षेत्रात कार्यरत असलेला कालखंड दिसून येतो. तत्कालिन कागदपत्रांच्या पूर्णत्वाच्या अभावी काही गायक / गायिकांच्या कालखंडाबाबत मतभेद दिसून येतात.

संदर्भग्रंथ सूची

१. अनिल विश्वास ते राहूल देव बर्मन, वसंत पोतदार

२. फिल्मी शास्त्रीय गीत, अंक भाग १, डॉ. लक्ष्मीनारायण गर्ग

३. रेडीओ और संगीत, डॉ. अशोक कुमार यमन

४. हिन्दी चित्रपट एवं संगीत का इतिहास, डॉ. विमल

५. फिल्म संगीत निर्देशक रोशन व उनके समकालीन संगीतकार, सीमा जौहरी

६. हिंदी चित्रपटगीत परंपरा आणि आविष्कार, अशोक दा. रानडे

७. रसिक बलमा, अशोक उजळंबकर

८. भारतीय फिल्म संगीत मे ताल समन्वय, डॉ. इन्दु शर्मा सौरभ

९. गाये चला जा, शिरिष कणेकर

१०. याद न जाए, श्रीहरी कुलकर्णी

११. आस्वादक संगीत समीक्षा, श्रीरंग संगोराम

१२. मोगरा फूलला, रेखा चवरे

१३. आर.डी. बर्मन, जीवन संगीत, मुकेश माचकर

१४. रहे न रहे हम, शांताराम मंकीकर

१५. बरसात मे हम से मिले तुम, विलासदत्त राऊत

१६. बखर गीतकारांची, विजय पाडाळकर

१७. नुरजहाँ ते लता, इसाक मुजावर

१८. संगीत का सौंदर्य बोध, डॉ. उमा गर्ग

१९.	कला संगम, खंड १, अजय देशपांडे

२०.	संगीत सरीता राग कसे ओळखावेत, डॉ. श्री. विठ्ठल ठाकुर १० वी आवृत्ती

मार्गदर्शक

डॉ.राजेंद्र ह. देखमुख
माजी संगीत विभाग प्रमुख
अमोलकचंद महाविद्यालय
यवतमाळ

संशोधक

पल्लवी प्रभुराज कुलकर्णी
संगीत विभाग
कै. सौ. कमलताई जामकर
महिला महाविद्यालय, परभणी